# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे (हिवाळी) अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मुंबईतील कुपर रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१) ९८४ (२९-०१-२०१५). श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुपर रुग्णालयात पुरेशा वैद्यकीय अधिका-यांअभावी शवविच्छेदन केंद्र बंद होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात पुरेशा प्रमाणात वैद्यकीय अधिका-यांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही. मुंबईतील कुपर रुग्णालयाच्या शवविच्छेदन केंद्रात वैद्यकीय अधिकारी गट -अ संवर्गाची चार पदे मंजूर आहेत. सदर पदांवर ३ स्थायी व १ बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईतील अनधिकृत बांधकामाबाबत**

**(२) १५०८१ (२९-०४-२०१६). श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईत सन २०१० नंतर ५६२ व सन २०१३ नंतर २१९ अनधिकृत बांधकामे तसेच त्यानंतरही सुमारे ३०० बांधकामे अनधिकृतरित्या उभारली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीत दोषी आढळून आलेल्यांवर तसेच सदरील बेकायदेशीर बांधकामावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१६) :** (१) व (२) नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांचे महानगरपालिकेकडून सर्वेक्षण सुरु असून काही ठिकाणचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे.

अंतरीम सर्वेक्षणानुसार नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत ८१६४ इतकी अनधिकृत बांधकामे आहेत. त्यासंबंधात महानगरपालिकेकडून अनधिकृत बांधकाम धारकांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या संबंधित तरतुदीअंतर्गत नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

सन २०१३ नंतरची ६५५ अनधिकृत बांधकामे महानगरपालिकेकडून निष्कासित करण्यात आली असून २० अनधिकृत बांधकाम धारकांवर ठाणे पोलीस स्थानकात फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय वैद्यकीय रुग्णालय (नागपूर) येथे जीवनावश्यक औषधांचा तुटवडा झाल्याबाबत**

**(३) १५२५६ (२९-०४-२०१६). प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ११०२९ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकिय रुग्णालय, नागपूर येथे अत्यंत जीवनावश्यक असलेले औषध उदा.डेक्सा, ॲट्रोफिल ही औषधी उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयात जीवनावश्यक औषधांचा तुटवडा होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, तेथील डॉक्टर रुग्णांना बाहेरुन औषध आणण्यास सांगत असून औषध व सर्जिकल साहित्य खरेदीचे अधिकार कोणास आहेत,

(४) रुग्णालयात दररोज सुमारे तीन हजार रुग्णसेवेचा लाभ घेतात असे असताना औषधांचा कृत्रीम तुटवडा होत आहे, हे खरे आहे काय ?

**श्री. गिरीष महाजन (१८-१०-२०१६) :** (१) नाही.

सदर संस्थेत डेक्सा, ॲट्रोफिल ही औषधे नेहमी उपलब्ध असतात.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) अधिष्ठाता यांना आर्थिक व वित्तीय अधिकाराअंतर्गत औषधे व सर्जिकल साहित्य खरेदी करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत काही रुग्ण रुग्णालयातील रांग टाळण्यासाठी बाहेरुन औषधे लिहून देण्याचा आग्रह करतात. अशावेळी डॉक्टर लिहून देऊ शकतात परंतु ही नियमित बाब नाही.
(४) नाही.

---

**मुंबई शहर व उपनगरातील जुन्या चाळींना कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याबाबत**

**(४) १६६४१ (०३-०५-२०१६). श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील जुन्या चाळींना अनेक वर्षे पाणीपुरवठा कमी दाबाने तसेच अनियमित होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरामध्ये ज्या ठिकाणी पाणीपुरवठा केला जातो त्या ठिकाणी पाण्याचे मीटर बसविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जुन्या इमारतीना पाण्याचे मीटर नसल्याचे आढळून आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा इमारतींना पाण्याचे मीटर बसविण्याबाबत तसेच जुन्या चाळींना नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेची पाणीपुरवठा वितरण व्यवस्था ही निवासी, अनिवासी, झोपडपट्टी, नवीन इमारती/जुन्या चाळी अशा सर्व ठिकाणी एकच स्वरुपाची असल्याने, सर्वत्र महानगरपालिकेच्या प्रचलित नियमावलीनुसार पाणी पुरवठा केला जातो.

(२) मुंबईच्या शहरी भागातील नवीन इमारती/आस्थापनांना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत जलमापकयुक्त जलजोडणी दिली जाते.

(३) मुंबईमधील पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या जुन्या चाळींना जलमापक विरहित जलजोडणी असून त्या ठिकाणी जलकर हा मालमत्ता करामध्ये आकारण्यात येतो.

(४) जलमापक विरहित जलजोडणी असलेल्या जुन्या चाळींच्या वापरकर्ता/भोगवटादार मालक यांच्याकडून अस्तित्वात असलेल्या जलजोडणीवर जलमापक बसविण्याचा विनंती अर्ज प्राप्त झाल्यास महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार उचित कार्यवाही करण्यात येते,

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील गुंठेवारीची बांधकामे नियमित करण्याबाबत**

**(५) १६८५५ (२७-०४-२०१६). श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व जिल्हयात गेल्या अनेक वर्षात झालेली गुंठेवारीची सुमारे अडीच लाख बांधकामे नियमित करण्याबाबतचा निर्णय माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यांच्या अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१६) :** (१) व (२) नागरी भागातील अनधिकृत बांधकामे नियमानुकूल करण्यासाठी शासनाने धोरण तयार करुन सदर धोरण मा.मंत्रिमंडळाच्या मंजूरीनंतर मा.उच्च न्यायालयात दिनांक ४.४.२०१६ रोजी सादर केले होते. मा.उच्च न्यायालयाने दिनांक २७.४.२०१६ रोजीच्या आदेशान्वये शासनाने तयार केलेल्या अनधिकृत इमारती नियमित करण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यास अनुमती नाकारली आहे. मात्र शासनाच्या वतीने नविन धोरण सादर करण्यास मुभा दिली आहे. त्यानुसार नविन धोरण ठरविण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आरे चेकनाका येथील मुख्य नाल्याचे पाणी रस्त्यावर साचत असल्याबाबत**

**(६) १८८९९ (२८-०४-२०१६). श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील गोरेगाव पूर्वेकडील आरे चेकनाका येथील मुख्य नाला तुडूंब भरून वाहत असल्याने नाल्याचे पाणी रस्त्यावर साचले आहे त्याचा या परिसरातील नागरिकांना तसेच वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नाल्यातील पाण्याचा निचरा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही. तथापि, आरे गोरेगांव पूर्वेकडील नाक्याजवळचा कल्व्हर्ट माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये चोक झाल्यामुळे रस्त्यालगतचा नाला भरुन वाहन होता.
(२) सदर बाबतीत तक्रार प्राप्त होताच महानगरपालिकेमार्फत तातडीने विविध प्रकारची सफाई यंत्रे व कामगारांमार्फत साफसफाई करण्यात आली. तसेच जेटींग मशिनचा वापर करुन पाईप कल्व्हर्टमधील चोक काढून तक्रारीचे निवारण करण्यात आले.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमळनेर नगरपालिकेने त्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या विहिरींवरुन पाणीपुरवठा खंडित केल्याबाबत**

**(७) १९११८ (०२-०५-२०१६). श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमळनेर तालुक्यातील गांधली, पिळोदे गावांकडे, पंचायत समितीकडे व भूमी अभिलेख खात्याकडे थकबाकी असल्याने अमळनेर नगरपालिकेने त्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या विहिरींवरून पाणीपुरवठा खंडित करण्याची नोटीस दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपालिकेची थकबाकी वसूल होणे आणि इतरांना पाणीपुरवठा देण्याची व्यवस्था करणे या दोन्ही गोष्टी पूर्ण होऊन सुरळीत व्यवस्था करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१६) :** (१) व (२) अमळनेर तालुक्यातील गांधली, पिळोदे गावांकडे, पंचायत समितीकडे व भूमी अभिलेख कार्यालयाकडे पाणीपट्टीची थकबाकी असल्याने अमळनेर नगरपालिकेने त्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या विहिरींवरुन पाणीपुरवठा खंडित करण्याची नोटीस दिली होती, ही बाब खरी आहे.

भूमी अभिलेख कार्यालयाच्या जोडणीची वाहिनी फुटल्याने व त्याद्वारे सेप्टीक टॅकचे पाणी मुख्य जलवाहिनीत जाऊन आरोग्याच्या समस्या निर्माण होऊ नये याकरिता व सदर जोडणीची वाहिनी दुरुस्त केली नसल्याने या कार्यालयाचा पाणीपुरवठा नगरपरिषदेने नाईलाजाने खंडित केला आहे.

भूमी अभिलेख कार्यालयाने थकबाकीची रक्कम नगरपरिषदेकडे भरली आहे.

अमळनेर तालुक्यातील गांधली, पिळोदे गावांकडे, पंचायत समितीकडे थकबाकीची मागणी करण्यात आली असून त्यांना करण्यात येणारा पाणीपुरवठा खंडित केलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या प्रशासकीय कामकाजाकरिता**
**मुंबई शहरात स्वतंत्र इमारत बांधण्याबाबत**

**(८) १९२९८ (१९-०८-२०१६). ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १४९७९ ला दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या प्रशासकीय कामकाजाकरिता मुंबई शहरात स्वतंत्र इमारत बांधण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ व त्यानंतर माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान देखील निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयासाठी सद्यःस्थितीत मुंबई येथे स्वतंत्र इमारत किंवा शासकीय जागा उपलब्ध करण्यात आली आहे काय, असल्यास, केव्हा व कोठे,

(३) नसल्यास, याबाबत अनेक वर्षापासूनची मागणी असताना अद्याप स्वतंत्र इमारत वा शासकीय जागा उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच, आयोगासाठी मुंबई विद्यापीठ, कलिना सांताक्रुझ परिसर येथे वा वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स परिसरात इमारत बांधण्याबाबत वा स्वतंत्र इमारतीत जागा उपलब्ध करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(५) त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्थापनेपासून आयोगाच्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही.

(२), (३), (४) व (५) महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यालयासाठी मुंबई येथे तयार इमारत किंवा शासकीय जागा उपलब्ध करुन घेवून त्यानंतर त्याठिकाणी स्वतंत्र इमारत बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

त्यानुसार शासन निर्णय क्र. मलोआ-१११६/प्र.क्र.८७/आठ, दिनांक ७ जुलै, २०१६ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयासाठी जागा उपलब्धततेबाबत विविध पर्यायांची तपासणी करण्यासाठी प्रधान सचिव (सेवा) यांचे अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीकडून अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**पुणे शहरातील इन्स्टिटट्यूट ऑफ मॅनेजमेंट करिअर डेव्हलपेंट या संस्थेच्या महाविद्यालयातील विद्यार्थीनीने घरी बसून पेपर लिहिल्याबाबत**

**(९) १९३११ (१९-०८-२०१६). डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील निगडी-यमुनानगर येथील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिटट्यूट ऑफ मॅनेजमेंट करिअर डेव्हलपेंट या संस्थेच्या महाविद्यालयामध्ये माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या परीक्षेच्या वेळी एका विद्यार्थीनीने घरी बसून पेपर लिहिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पुणे विद्यापीठाच्या सहायक कुलसचिवांची चतुःशृंगी पोलीस स्थानकात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

पुणे शहरातील निगडी येथील इन्स्टिटट्युट ऑफ मॅनेजमेंट करिअर डेव्हलपमेंट या महाविद्यालयातील दोन शिपाई एका विद्यार्थीनीच्या घरी वेगवेगळ्या परीक्षेच्या उत्तरपत्रिकेचे ५ लिफाफे घेऊन गेल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) सदर घटनेबाबत सहायक कुलसचिव परीक्षा विभाग, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ यांनी दिलेल्या तक्रारीवरुन चतु:श्रुंगी पोलीस स्टेशन, पुणे येथे ३ आरोपींविरुध्द गु.र.नं. ३०३८/२०१६, महाराष्ट्र विद्यापीठाच्या मंडळाचा व इतर विनिर्दिष्ठित परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध अधिनियम १९८२ चे कलम ७ व ८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यातील २ आरोपींना अटक करुन नंतर जामिनावर मुक्तता केली आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये आतापर्यंत गुन्ह्यामधील नमूद विद्यार्थीनीच्या एम.पी.एम. परीक्षेच्या दिनांक १७ मे, २०१६ रोजीच्या कलेक्टीव्ह बार्गेनिंग या विषयाच्या व दिनांक १८ मे, २०१६ रोजीच्या केसेस इन एच.आर.एम. या विषयाच्या उत्तरपत्रिका बदलल्याबाबत किंवा त्यामध्ये फेरफार केल्याचे निष्पन्न झालेले नाही. सद्य:स्थितीत गुन्हा तपासावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कश्यपी (जि.नाशिक) धरणग्रस्तांना विविध प्रलंबित मागण्यांबाबत**

**(१०) १९३३६ (१९-०८-२०१६). श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक १८५३८ ला दिनांक १३ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कश्यपी (जि.नाशिक) धरणग्रस्तांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांच्या मागण्यांबाबतचा तपशील काय होता तसेच या धरणग्रस्तांना कराराप्रमाणे नाशिक महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याची मागणी रास्त असून करारनाम्याच्या अनुषंगाने तात्काळ आवश्यक कार्यवाही करण्याचे जिल्हाधिकारी नाशिक यांनी महानगरपालिका आयुक्तांना दिनांक ३ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास सूचना केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक ०३/१२/२०१५ च्या पत्रान्वये कश्यपी धरणग्रस्तांची नाशिक महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याच्या मागणीच्या अनुषंगाने, नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना कळविले होते.
(३) या संदर्भात आयुक्त, नाशिक महानगपालिका यांनी शासनास प्रस्ताव सादर केला होता.

तथापि, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २७/०९/२०१० च्या शासन निर्णयानुसार प्रकल्पाग्रस्तांच्या नियुक्त्या या जाहिरात देऊन व त्यांची सेवा प्रवेश अर्हता व गुणवत्ता विचारात घेऊन करणे आवश्यक असल्याने, त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत नाशिक महानगरपालिकेस सूचित करण्यात आले.

या संदर्भात मा.मंत्री (जलसंपदा) यांच्याकडे दिनांक २८/०६/२०१६ रोजी झालेल्या बैठकीत संबंधित प्रकल्पग्रस्तांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सामावून घेणे प्रचलित नियमानुसार शक्य नसल्याने, धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचे निश्चित करण्यात आले. सदर समितीसमोर प्रस्ताव सादर करून पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तळेगांव दाभाडे जवळील सुदुबरे (जि.पुणे) गावातील दोन आदिवासी बहिणींवर अज्ञात व्यक्तीने हल्ला केल्याबाबत**

**(११) १९३४२ (१९-०८-२०१६). डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेगांव दाभाडे जवळील सुदुबरे (जि.पुणे) गावातील नैसर्गिक विधीसाठी घराबाहेर गेलेल्या दोन आदिवासी बहिणींवर दिनांक २१ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास अज्ञात व्यक्तीने धारदार शस्त्राने वार केल्याने त्यात लहान बहिणीचा मृत्यू झाला असून मोठया बहिणीवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी तळेगांव एमआयडीसी पोलीस ठाण्यात खून, खूनाचा प्रयत्न इत्यादी कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.

सदर प्रकरणातील लहान बहिणीचा मृत्यू झाला असून मोठ्या बहिणीला रुग्णालयातून औषधोपचारांनतर सोडून देण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी एका आरोपींविरुध्द तळेगांव एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गु.र.नं. ३९/२०१६ भांदवि कलम ३०२, ३०७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करुन त्यांचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रोहा (जि.रायगड) येथील गुटखा कंपन्यांवर कारवाई करणेबाबत**

**(१२) १९३७१ (१९-०८-२०१६). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा (जि.रायगड) तालुक्यातील बाहे गावाच्या हद्दीतील निर्जनस्थळी दिनांक २४ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास लाखो रूपयांचा गुटखा सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.मेश्राम यांनी आपल्या सहकाऱ्यांसह धाड टाकून जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोहा परिसरात मोठया प्रमाणात गुटख्याची अवैध विक्री करणाऱ्या टोळ्या सक्रीय आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी गुटखा बनविणाऱ्या कंपन्या असून त्यांच्या गुटखा बनविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या मशिनरी जप्त करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अवैध गुटखा बनविणे व विक्री प्रकरणात असलेल्या आरोपींविरूद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) रोहा (जि.रायगड) तालुक्यातील बाहे गावच्या हद्दीत घडलेल्या घटनेबाबत रोहा पोलीस, ठाणे येथे तीन आरोपीविरुध्द गु.र.नं.११७/२०१६ भादंविस कलम ४२०, १८८, २७३, १७९, ३४ अन्न सुरक्षा व मानके कायदा ०६ व नियम २०११ चे अंतर्गत कलम २६ (२) (i), २६(२) (iv), २७ (३) (d), ५९ (iii) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणातील तीनही आरोपींना अटक करुन जामिनावर मुक्त केले आहे. तसेच सदर आरोपीत यांचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी नगरसेवकास अपात्रतेची नोटीस बजावल्याबाबत

**(१३) १९४६८ (१९-०८-२०१६). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडको, नवीन नाशिक (जि.नाशिक) येथील त्रिमुर्ती चौकात राहत्या घराच्या तसेच संपर्क कार्यालयाच्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी प्रभाग क्रमांक-४७ 'अ' आणि 'ब' चे नगरसेवक श्री.सुधाकर बडगुजर व त्यांच्या पत्नी सौ.हर्षा बडगुजर यांना आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी त्यांचे नगरसेवक पद रद्द का करू नये अशा आशयाची अपात्रतेची नोटीस बजावली असल्याचे दिनांक १८ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधितांच्या बंगल्याच्या बांधकामाचे आतील भागात मंजुर नकाशापेक्षा केलेले इतर बदल व अतिरिक्त बांधकाम आणि परवानगी न घेता बांधलेले गाळे ही बाब चौकशीत निष्पन्न झाल्याच्या पार्श्वभुमीवर सदरील कार्यवाही करण्यात आली, हे ही खरे आहे काय;
(३) असल्यास, उक्त अपात्रतेच्या नोटीशीचे अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१६) :** (१) होय.
(२) संबंधित बंगला व गाळ्याचे क्षेत्र हे सिडको विकास प्राधिकरणाच्या अधिपत्याखाली येत असल्याने, सिडको विभागाचे अभिप्राय विचारात घेऊन नाशिक महानगरपालिकेने कार्यवाही केली आहे.

(३) व (४) यासंदर्भात संबंधितांनी मा.दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला असून, दाव्याचा निकाल लागेपर्यंत अपात्रतेसंबंधी कोणतीही कार्यवाही करता येत नाही.

---

**कोल्हापूर येथील अंबाबाई मंदिरास मुबलक पाणी पुरवठा करण्याबाबत**

**(१४) १९५१७ (१९-०८-२०१६). श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १४९०१ ला दिनांक १६ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील अंबाबाई मंदिरास मुबलक पाणी पुरवठा करणा-या अंदाजपत्रकास दिनांक ४ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या सभेत समितीने रुपये १० लाख २० हजार २०० इतक्या रक्कमेस मंजूरी दिली असून सदर रक्कम कोल्हापूर महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रक्कम केव्हा वर्ग करण्यात आली आहे,

(३) असल्यास, वर्ग करण्यात आलेल्या रकमेनुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम पूर्ण होण्यास महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. दि.३१/०३/२०१६ रोजी रक्कम रु.१०,२०,०००/- वर्ग करण्यात आली आहे.

(३) सदर कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण करुन दिनांक ०४/०७/२०१६ रोजी ने कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारणीस दिरंगाई होत असल्याबाबत**

**(१५) १९५३५ (१९-०८-२०१६). श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक १५३५३ ला दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवाजी महाराज यांचे अरबी समुद्रातील प्रस्तावित स्मारकासाठी लागणाऱ्या सर्व परवानग्या मिळवून मे महिन्यात या स्मारकाचे भूमिपूजन करण्यात येणार असल्याची ग्वाही मा.मुख्यमंत्री महोदयांनी विधानमंडळ सभागृहात दिल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अरबी समुद्रात उभारण्यात येणाऱ्या प्रस्तावित स्मारकाच्या जागेस कफ परेड नजीकच्या मच्छिमारांनी मासेमारीचा रोजगार धोक्यात येत असल्याने विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शिवस्मारकाचे काम सुरु करण्याबाबत तसेच सदर मच्छिमारासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) स्थानिक मच्छिमारांच्या विरोधासंदर्भात चर्चेद्वारे त्यांचे गैरसमज दूर करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. सदर स्मारकाच्या कामाच्या अंमलबजावणीसाठी नेमलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारास प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ४० महिन्याचा कालावधी विहित करण्यात आला आहे व त्यांचे काम प्रगतीपथावर आहे.

---

**मुंबई व ठाणे जिल्ह्यातील विक्रीकर विभागामध्ये कामे करणाऱ्या कंत्राटी कामगारांना दोन महिन्यापासून मासिक वेतन न मिळाल्याबाबत**

**(१६) १९५६९ (१९-०८-२०१६). श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व ठाणे जिल्ह्यातील माझगांव, वांद्रे, कोकणभवन, पालघर व ठाणे येथील विक्रीकर विभागातील एकूण ६०० कंत्राटी लिपिक कामगारांना दोन महिन्यांपासून मासिक वेतन न मिळाल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विक्रीकर विभागात 'पेरीसॉफ्टवेअर सोल्युशन' या कंपनीचे कंत्राट असून लिपिक पदावर भरती करताना प्रत्येकी रुपये १५००/- नोंदणीसाठी घेतले जातात व भविष्य निधीची रक्कमही कापला जातो परंतु याबाबत कोणतीही पोहोच पावती दिली जात नसून याप्रकरणी कंत्राटी लिपिक कामगारांनी विशेष विक्रीकर आयुक्तांशी संपर्क साधला असता त्यांनी ही कंपनी फसवी असून विक्रीकर विभागाशी याचा काहीही संबंध नसल्याचे सांगितले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

विक्रीकर विभाग व संबंधित कंपनी यांच्यात झालेल्या करारनाम्यात उमेदवारांकडून नोंदणी शुल्क घेण्याची तरतूद नाही. तसेच, उमेदवारांकडून कपात केलेली भविष्यनिर्वाह निधीची रक्कम भविष्यनिर्वाह निधी कार्यालयात जमा केल्याचा पुरावा कंत्राटदाराने विक्रीकर कार्यालयास सादर केला आहे.

(३) कंत्राटदाराला दिलेले काम दिनांक ३१ जुलै, २०१६ पासून बंद करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नाशिकसह राज्यातील अन्य प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून आर.सी.बुक देण्याचे काम बंद असल्याने वाहनधारकाची होत असलेली गैरसोय

**(१७) १९५७८ (१६-०८-२०१६) डॉ.अपूर्व हिरे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकसह राज्यातील अन्य प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून माहे फेब्रुवारी, २०१६ पासून नविन वाहनांची नोंद केल्यानंतर आर.सी. बुक (वाहन नोंदणी प्रमाणपत्र) देण्याचे काम बंद असून नाशिक परिवहन कार्यालयातील ३५ हजार वाहनधारकांना आर.सी. बुक (वाहन नोंदणी प्रमाणपत्र) देण्यात आलेले नसल्याचे दिनांक १४ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१७-१०-२०१६) :** (१) व (२) होय. स्मार्ट कार्ड नोंदणी प्रमाणपत्राबाबत सेवा पुरवठादारासोबतचा करार संपुष्टात आल्यामुळे वाहन नोंदणी प्रमाणपत्राचा तुटवडा निर्माण झाला होता, हे खरे आहे.

परिवहन आयुक्त कार्यालयातर्फे माहे जून, २०१६ मध्ये एकूण ७२००० नोंदणी प्रमाणपत्रे नाशिक विभागास देण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे विभाग स्तरावर नोंदणीप्रमाणपत्र छपाई करुन घेण्याकरिता परिवहन आयुक्त कार्यालयाने दिनांक २४/०८/२०१६ रोजी नोंदणी प्रमाणपत्रे कार्यालयाअंतर्गत छपाई करुन घेण्याकरिता परिवहन आयुक्त कार्यालयांअंतर्गत छपाई करुन वितरीत करणेची प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांना परवानगी दिली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाने प्रस्तावित केलेल्या शेतकऱ्यांना हमी भाव मिळणेबाबत**

**(१८) १९५९२ (१६-०८-२०१६) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषि विद्यापीठांनी केलेल्या अभ्यासपुर्ण अहवाल व शिफारशीप्रमाणे राज्य शासनाने केंद्र शासनास वाढीव हमी भावांची शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या शिफारशी प्रमाणे केंद्र शासनाने हमी भावात तुटपुंजी वाढ केल्याने राज्य शासनाने स्वत:च्या तिजोरीतून शिफारस केलेला हमी भाव शेतकऱ्यांना द्यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिंधीनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०७-१०-२०१६) :** (१), (२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, वि.प.स. यांनी "केंद्र शासनाने हमी भावात तुटपूंजी वाढ केल्याने राज्य शासनाने स्वत:च्या तिजोरीतून शिफारस केलेला हमी भाव शेतकऱ्यांना द्यावा" अशा मागणीचे दिनांक १५/०६/२०१६ चे निवेदन मा. मुख्यमंत्री यांना दिलेले आहे.

किमान आधारभूत किंमती जाहीर करणे ही बाब पूर्णत: केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. केंद्र शासनाचे केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगामार्फत बहुव्यापक योजनेअंतर्गत पीक उत्पादन खर्चाची आकडेवारी गोळा करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यरत आहे. राज्यात महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी मार्फत केंद्र शासनाची बहुव्यापक पिक उत्पादन खर्च योजनेअंतर्गत माहिती संकलनाचे ६० गांवसमुह कार्यरत आहेत.

केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगामार्फत उपलब्ध पीक उत्पादन खर्च आणि विविध राज्य शासनांकडून केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाला प्रस्तावित केलेल्या किंमती व इतर घटकही विचारात घेऊन २५ पिकांच्या किमान आधारभूत किंमतीचे प्रस्ताव केंद्र शासनास सादर करते व त्या आधारे केंद्र शासन किमान आधारभूत किंमती जाहीर करते. केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किंमती सर्व राज्यांना लागू होतात.

राज्य शासन प्रत्येक वर्षी पीक उत्पादन खर्च योजनेंतर्गत खरीप, रब्बी व ऊस पीकांसाठी चारही कृषी विद्यापीठांकडून पीक उत्पादन खर्चाच्या प्राप्त होणाऱ्या माहितीच्या आधारे व विविध निविष्ठांची प्रचलित भावपातळी लक्षात घेवून उत्पादन खर्चावर आधारित किंमती १८ पीकांकरीता केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाकडे प्रस्तावित करण्यात येतात.

राज्य शासनामार्फत पीक उत्पादन खर्चाची माहिती गोळा करतांना केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाच्या पीक उत्पादन खर्च काढण्याच्या कार्यपध्दती शिवाय खेळत भांडवलावरील व्याज ६% दराने संपूर्ण वर्षासाठी, कुटुंबातील व्यक्तींचे श्रम दिवस रोजंदारीवरील श्रम दिवसांपेक्षा २५% अधिक, १०% देखरेख खर्च, पणन व वाहतुकीवरील खर्च आणि प्रति क्विंटल उत्पादन खर्चावर १५% नफा या वाढीव बाबी समाविष्ट करुन प्रति क्विंटल किंमत केंद्रीय कृषी मुल्य व किंमत आयोगाकडे प्रस्तावित केली जाते.

खरीप, रब्बी व ऊस या पीकांचे सन २०१६-१७ विक्री हंगामासाठी राज्य शासनाने प्रस्तावित केलेली किंमती ही केंद्र शासनाने जाहिर केलेली किमान आधारभूत किंमतीपेक्षा ८०% ते १२०% अधिक असल्याने, त्यामधील तफावत रकमा (वाढीव हमीभाव) राज्य शासनाकडून देणेबाबतची बाब शासनाचे विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या मुरूड-मुंबई बसला लागलेल्या आगीत नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना मदत करण्याबाबत**

**(१९) १९६२६ (१६-०८-२०१६). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड आगारातून रवाना झालेली मुरूड-मुंबई बसचे इंजिन बिघाडामुळे व गाडीचे ब्रेक अचानक लॉक झाल्याने सदर बसला दिनांक २५ एप्रिल, २०१६ रोजी पनवेल तालुक्यातील चिंचवण गावाच्या हद्दीत आग लागून बस पूर्णपणे जळून खाक झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बसमधील ५४ प्रवाशांचे महत्वाचे दस्ताऐवजासह सर्व सामान आगीत खाक झाले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नुकसानग्रस्त प्रवाशांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१७-१०-२०१६) :** (१), (२) व (३) दिनांक २५/०४/२०१६ रोजी मुरुड आगाराची बस क्र.एमएच ०६ एस ८२३५ ला आग लागून जळाली. या बसमधील सर्व प्रवाशांना सामानासह बसमधून उतरविण्यात आले. तथापि, एका प्रवाशाचे सामान जळाल्याचे व बसमधील आग ही बॅटरी बॉक्स ते मेन स्वीचकडे जाणारी वायर शॉर्ट सर्कीटने जळाल्यामुळे लागल्याचे निदर्शनास आले आहे. सदर बसमधील सामान जळालेल्या प्रवाशास नुकसान भरपाई देण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील देवस्थान ईनाम जमिनी वहिवाटदारांच्या नांवे करण्याबाबत**

**(२०) १९६२९ (१६-०८-२०१६). डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १८३१० ला दिनांक २८ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील देवस्थान ईनाम जमिनीबाबत समस्यांचा अभ्यास करून शिफारशी करण्याकरिता तत्कालीन राज्यमंत्री (महसुल) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापित समितीचा अहवाल स्वीकृतीसंबंधीच्या विचाराधीन बाबींवर शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवाल स्वीकृत करण्यात आला आहे काय व त्यानुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, राज्यातील देवस्थान ईनामाच्या अहस्तांतरणीय जमिनी वहिवाटदारांच्या नांवावर करण्यासंदर्भात निर्णय केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-१०-२०१६) :** (१), (२) व (३) राज्यातील देवस्थान ईनाम जमिनींबाबत समस्यांचा अभ्यास करुन शिफारशी करण्याकरिता तत्कालीन राज्यमंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे. सदर अहवाल शासनाने स्वीकृत केला असून, राज्यातील देवस्थान जमिनी यांच्या संदर्भात शासनाची भूमिका ठरविण्याकरीता याबाबत सर्वंकष अभ्यास करुन शासनास शिफारशी करण्याकरीता प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३ मार्च, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये एक समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल लवकरच अपेक्षित असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यातील शिफारशी विषयी उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

---

## केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाच्या महिला कर्मचाऱ्यांना विकलांग व दुर्धर आजाराने त्रस्त असलेल्या मुलांची काळजी घेण्यासाठी विशेष रजा मंजुर करण्याबाबत

**(२१) १९७४३ (२३-०८-२०१६). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाच्या महिला कर्मचाऱ्यांनाही विकलांग व दुर्धर आजाराने त्रस्त असलेल्या मुलांची काळजी घेण्यासाठी विशेष रजा मंजुर करण्याची आग्रही मागणी केली जात असल्याचे दिनांक १७ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कैंद्रीय नागरी सेवा (रजा) नियमावलीतील ४३ नियम (सी) मधील तरतुदींच्या आधारे विकलांग मुलांची काळजी घेण्यासाठी शासकीय कर्मचारी असलेल्या मातांना रजा देण्याची तरतुद आहे परंतु राज्य शासनाच्या नियमावलीत ही तरतुद नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या उदात्त मानवतावादी परंपरा व धोरणास अनुसरुन विकलांग मुले असलेल्या राज्य शासनाच्या महिला कर्मचा-यांना विशेष रजा मंजुर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

शासनाने विकलांग अपत्य असलेल्या शासकीय महिला कर्मचाऱ्यांना ७३० दिवसांची विशेष बालसंगोपन रजा मंजूर करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २१/०९/२०१६ रोजी निर्गमित केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्लॅनमधील माध्यमिक व उच्च माध्यमिक**
**शाळा व वर्ग तुकड्या नॉन प्लॅनमध्ये घेण्याबाबत**

**(२२) १९७९२ (२३-०८-२०१६). डॉ.अपूर्व हिरे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे : तारांकित प्रश्न क्रमांक १६०३३ ला दिनांक १२ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्लॅनमधील शाळा, तुकड्या आणि पदे यांचा समावेश नॉन प्लॅनमध्ये करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास वेळोवेळी सादर करण्यात आलेला असूनही मान्यता न मिळाल्याने सदरचा प्रस्ताव पुनः मा.मंत्री (वित्त) महोदयांकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्या १०० टक्के अनुदानावर येऊनही त्या नॉन प्लॅनमध्ये न गेल्याने तसेच कार्यरत शिक्षकांना वेळेवर वेतन मिळत नसल्याने सदरहु शाळा नॉन प्लॅनमध्ये घेणेस वित्त विभागाकडून मान्यता प्राप्त झाली आहे काय,
(३) असल्यास, १०० टक्के अनुदानावरील शाळा व तुकड्यांवर कार्यरत शिक्षक कर्मचा-यांना नियमित मासिक वेतन मिळण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, तसेच सदरहु कार्यवाही केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (२४-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ च्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता प्राप्त झाली असून सदर नस्ती अनौपचारिक संदर्भ प्राप्त करण्यासाठी वित्त विभागास सादर करण्यात आली आहे.
(३) व (४) वित्त विभागास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. वित्त विभागाची मान्यता मिळाल्यानंतर शाळा व वर्ग तुकडयांना नॉन प्लॅन मध्ये घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

**कल्याण (जि. ठाणे) येथील डम्पिंग ग्राउंडला आग लागल्याच्या घटनेची चौकशी करण्याबाबत**

**(२३) १९८५३ (२३-०८-२०१६). श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि. ठाणे) येथील डम्पिंग ग्राऊंडला दिनांक २८ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास आग लागल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) दिनांक ३१ मे, २०१६ रोजी आधारवाडी क्षेपणभूमीला लागलेली आग कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून नियंत्रणाखाली आणून विझविण्यात आली,

सद्यस्थितीत सदर क्षेपणभूमी शास्त्रोक्त पध्दतीने कायमस्वरुपी बंद करण्याकरीता महानगरपालिकेकडून निविदा प्रक्रिया सुरु असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी (जि.परभणी) तालुक्यातील शासकीय जमिनीवर झालेल्या अतिक्रमणाबाबत**

**(२४) १९८५७ (१६-०८-२०१६). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक १६६७७ ला दिनांक १४ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी (जि.परभणी) तालुक्यातील १४७ सर्व्हे नंबर मधील सुमारे १४७६ एकर शासकीय जमिनीवर झालेल्या अतिक्रमणाचे अभिलेखे तपासणी व प्रत्यक्ष स्थळ पाहणीचे काम करण्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी सन २०१५-१६ दरम्यान पथकाची नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बाबत थोडक्यात माहिती काय आहे,

(३) असल्यास, सदरील पथकांनी अभिलेखे तपासणी व स्थळ पाहणीचे काम पुर्ण केले आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-१०-२०१६) :** (१), (२) व (३) उपविभागीय अधिकारी, परभणी यांनी दिनांक १५/०७/२०१५ रोजीच्या आदेशान्वये परभणी शहरातील एकूण १४७ शासकीय सर्व्हे नं. चे अभिलेख तपासणी व स्थळपाहणी करण्यासाठी संबंधित नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, नगररचना विभागाचे प्रतिनिधी, परभणी महानगरपालिकेचे प्रतिनिधी, उप अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालयाचे प्रतिनिधी यांचा समावेश असलेले पथक नियुक्त केले आहे. सदर पथकाकडून प्राप्त माहितीनुसार उपविभागीय अधिकारी, परभणी यांच्या स्तरावर अंतिम अहवाल तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोपरी रेल्वे उड्डाणपुलाचे रुंदीकरण करण्याबाबत**

**(२५) १९९८५ (२३-०८-२०१६). श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक १८२०६ ला दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरापासून जाणाऱ्या पूर्व द्रुतगती महामार्गावर कोपरी येथील रेल्वे उड्डाणपुलावरील वाहनांची कोंडी सोडविण्यासाठी सदर उड्डाणपुलाच्या रुंदीकरणाचा निर्णय एमएमआरडीएने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूलाच्या रुंदीकरणाचे काम त्वरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर कामास किती खर्च येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) सदर पुलाच्या कामाचे सविस्तर सर्वेक्षण, डिझाईन व अंदाजपत्रक बनविण्याकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सल्लागारांची नेमणूक करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन घेतला आहे. तसेच प्रकल्पाचे सविस्तर डिझाईन तयार करुन रेल्वे विभागाकडे अंतिम मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहे. सदर पुलाचे कामास सुमारे रु.२५८ कोटी खर्च अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शहरी भागातील पाणीपुरवठा योजनेबाबत**

**(२६) २०१६७ (२४-०८-२०१६). श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शहरी भागातील पाणी टंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन तातडीच्या पाणी पुरवठा योजना सुरु करण्यासाठी असलेली लोकवर्गणीची अट शासनाने शिथील केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, 'अ', 'ब' व 'क' वर्ग नगरपालिका आणि महानगरपालिका क्षेत्रातील योजनांसाठी १० टक्क्यांऐवजी किती टक्के लोकवर्गणी शिथील करण्यात आली आहे,
(३) असल्यास, शहरी भागातील पाणीपुरवठ्याची सद्यःस्थिती काय आहे व किती पाणीपुरवठा योजना नव्याने कार्यान्वित करण्यात आल्या आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोंढवा बुद्रुक (जि. पुणे) या गावाला पुरविण्यात नियमित पाणीपुरवठा होत नसल्याबाबत**

**(२७) २०२३१ (२३-०८-२०१६). श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोंढवा बुद्रुक (जि. पुणे) या गावाला पुरविण्यात येत असलेल्या पाणी पुरवठा योजनेतून कमी दाबाने तर काही ठिकाणी नळालाच पाणी येत नसल्याने नागरीकांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, तदनुषंगाने कोंढवा बुद्रुक परिसरात पुरेसा व नियमित पाणी पुरवठा करण्याचे दृष्टीने शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कोंढवा बुद्रुक, (जि.पुणे) या गावाला १२५ द.ल.घ.मी. प्रतिदिन क्षमतेचे वडगांव जलशुध्दीकरण केंद्रातून पाणीपुरवठा करण्यात येतो. जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता व जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता व जलशुध्दीकरण केंद्राचे कार्यक्षेत्रातील लोकसंख्या यांचा विचार करता सदरची क्षमता कमी पडत आहे. त्यामुळे काही भागामध्ये कमी दाबाने व काही भागामध्ये पाणी येत नाही अशी स्थिती आहे. ज्या भागामध्ये नळाला पाणीपुरवठा होत नाही अशा भागामध्ये टॅंकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो.
(२) प्रकरणी महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी पाहणी करण्यात येत आहे. सदर पहाणीनुसार भौगोलिक दृष्ट्या उंचावरच्या भागात अपुरा पाणीपुरवठा होत असल्याची बाब आढळून आली आहे.
(३) कोंढवा बुद्रुक व वडगांव जलशुध्दीकरण केंद्राच्या अखत्यारीतील अशा प्रकारच्या इतर भागांमध्ये पाणीपुरवठा नियमित करण्याच्या दृष्टीने पुणे महानगरपालिकेमार्फत वडगांव जलशुध्दीकरण केंद्र येथे वाढीव १२५ दक्षलक्षघनमीटर क्षमतेचे जलशुध्दीकरण प्रकल्प उभारण्याचे काम हाती घेतले असुन, सदरचे काम अंतिम टप्प्यामध्ये आहे. त्यामुळे पुढील दोन महिन्यांमध्ये या भागामध्ये पुरेसा पाणीपुरवठा करणे शक्य होणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील कंत्राटी निदेशकांना नियमित सेवेत सामावून घेणेबाबत

**(२८) २०२६५ (२३-०८-२०१६). श्री.रामनाथ मोते, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : तारांकित प्रश्न क्रमांक १६०५७ ला दिनांक १६ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शेकडो निदेशक कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या कार्यरत असलेल्या अशा कंत्राटी निदेशकांची संख्या किती आहे तसेच कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या व सद्या कार्यरत असलेल्या निदेशकांची नियुक्ती पात्रता, आरक्षण, गुणवत्ता व जाहिरातीच्या माध्यमातून करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, संस्थांमधील निदेशकांची शेकडो पदे रिक्त असूनही या कंत्राटी निदेशकांना नियमितपणे सेवेत सामावून घेण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी अर्ज क्र.४६७/२०१५ मध्ये दिनांक २७ एप्रिल, २०१६ रोजी शासनास कोणत्या प्रकारचे आदेश/निर्देश दिले आहेत व त्यानुसार काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (२०-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) सध्या ३३१ कंत्राटी कर्मचारी असून कार्यरत असलेल्या निदेशकांची नियुक्ती पात्रता, आरक्षण, गुणवत्ता व जाहिरातीच्या माध्यमातून करण्यात आली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मूळ अर्ज क्र.४६७/२०१५ मध्ये दिनांक २७ एप्रिल, २०१६ रोजी मूळ अर्ज दाखल केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित पदावर सामावून घेण्याचे आदेश दिले आहेत. मा.न्यायाधिकरण, मुंबई यांचे दिनांक २७/०४/२०१६ च्या आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर येथील झोपडपट्टी लाभार्थ्यांना पक्की घरे देण्याबाबत

**(२९) २०३६० (२३-०८-२०१६). श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील भगवान नगर झोपडपट्टी लाभार्थ्यांना आठ वर्षे पूर्ण झाली तरी घरे तयार असूनही महापालिका प्रशासन पक्की घरे देण्याबाबत जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदरील लाभार्थ्यांना पक्की घरे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१६) :** (१) व (२) आय.एच.एस.डी.पी. योजने अंतर्गत भगवाननगर येथे ३७२ सदनिका बांधण्यात आलेल्या आहेत. ३०० पात्र लाभार्थ्यांना सदनिकेचा ताबा देण्यात आलेला आहे.

उर्वरित ७२ लाभार्थ्यांची पात्रता तपासण्याची प्रक्रिया चालू असून पात्र लाभार्थ्यांना सदनिकांचा ताबा देण्यात येणार आहे.

(३) मंजूर कंत्राटदाराने वेळेत काम पूर्ण न केल्याने त्याची अनामत रक्कम जप्त करुन दुसऱ्या कंत्राटदाराकडून काम करुन घेण्यात आले आणि त्यावेळी वाळू उपलब्ध न झाल्याने बांधकामास विलंब झाला आहे तथापि सदर काम पुर्ण झाले आहे.

---

## मुंबईतील मोनोरेल प्रकल्प तोट्यात आल्याबाबत

**(३०) २०३७० (२३-०८-२०१६). श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मोनोरेल प्रकल्पात २ वर्षात १५९ कोटी रुपयांचा तोटा झाला असून तोटयासह मोनोरेलच्या खर्चात सुमारे २२० कोटी रुपयांची वाढ झाली असल्याची बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले व त्यानुसार मोनो प्रकल्पावरील तोटा भरून काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१६) :** (१), (२) व (३) मोनोरेल टप्पा-१ वडाळा ते चेंबूर या मार्गावर कार्य व देखभालीवर मागील दोन वर्षात रु.४३ कोटी इतके नुकसान झाले आहे. तसेच मोनोरेल प्रकल्पाच्या खर्चामध्ये रु.२२० कोटी ही वाढ नसून निविदेत अंतर्भूत नसणाऱ्या सोयी उदा.सरकते जिने, बीम स्वीच इत्यादि उपलब्ध करुन देण्यावरील खर्च आहे.

परंतु मोनोरेल टप्पा-२ वडाळा ते संत गाडगे महाराज चौक हा प्रवाशी वाहतुकीकरिता खुला झाल्यानंतर सदर मार्गावरील प्रवाशी संख्येमध्ये वाढ होणार आहे त्यामुळे कार्य व देखभाल खर्चावरील होणारे नुकसान भरुन काढण्यास मदत होणार आहे. याव्यतिरिक्त मोनोरेलचे डब्बे व मोनोरेल स्थानकामध्ये जाहिरातीद्वारे उत्पन्न वाढविण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रस्तावित आहे.

---

**राज्यात स्वतंत्र जलवाहतूक महामंडळ स्थापन करण्याबाबत**

**(३१) २०३८१ (२३-०८-२०१६). श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील रखडलेले जलवाहतुकीचे प्रकल्प मार्गी लावण्यासाठी स्वतंत्र जलवाहतूक महामंडळ स्थापन करण्यास मा.मुख्यमंत्री यांनी तत्वत: मान्यता दिली असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सागर किनाऱ्यावरील जेट्टींची विकास झाल्यानंतर जेट्टींची वापर कोणकोणत्या कामासाठी केला जाणार आहे, तसेच नादुरुस्त जेट्टींची दुरुस्ती केल्यानंतर त्याचा प्रवासी वाहतुकीसाठी वापर करण्यासाठी खाजगी उद्योजकांना देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सागर किनाऱ्यावरील जेट्टींची विकास करून राज्यात प्रवासी फेरी बोट, रो-रो सेवा, मालवाहतूक तसेच पर्यटनास या महामंडळामुळे चालना मिळणार असल्याने महामंडळ स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१६) :** (१) होय.
(२), (३) व (४) प्रवासी फेरी, रो-रो सेवा, मालवाहतूक व पर्यटनासाठी खाजगी उद्योजकांना वापरावयास देण्यासाठी किनारपट्टीवरील सुयोग्य अशा जेट्टीची निवड करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. त्यानंतर, निविदा प्रक्रियेद्वारे खाजगी विकासकाची निवड करण्यात येईल.

तसेच, जलवाहतूक महामंडळ स्थापन करण्यासाठी महामंडळाची व्याप्ती, कामाचा वाव, अंमलबजावणी यंत्रणा इ. बाबी ठरविण्याची कार्यवाही महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने नियुक्त केलेल्या सल्लागारांमार्फत हाती घेण्यात आली आहे.

---

**महाराष्ट्र प्रदेश विकास प्राधिकरण स्थापन करण्याबाबत**

**(३२) २०३८६ (२३-०८-२०१६). श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानु खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर राज्यातील अन्य महानगरपालिका, नगरपरिषद आणि त्या लगतच्या गावांचा सुनियोजित विकास व्हावा तसेच या क्षेत्रात राबविल्या जाणाऱ्या प्रकल्पांमध्ये सुसूत्रता यावी यासाठी शासनाने महाराष्ट्र प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मसुद्यास मान्यता दिली असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मसुदा अंमलात आणण्याबाबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१६) :** (१) मंत्रीमंडळाच्या दिनांक ३ मे, २०१६ च्या बैठकीत महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अध्यादेश २०१६ च्या मसुद्यास मंजुरी देण्यात आली.

(२) व (३) मंत्रीमंडळाच्या दि.३ मे, २०१६ च्या बैठकीतील निर्णयानुसार दिनांक १३ जून, २०१६ रोजी महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अध्यादेश, २०१६ प्रख्यापित करण्यात आला आहे.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रात चोरीच्या नळजोडण्या असल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(३३) २०४४२ (२३-०८-२०१६). श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुमारे ३० हजारांहून अधिक चोरीच्या नळजोडण्या असल्याने या कारणास्तव संबंधित विभागातील शहरवासियांना मोठ्या प्रमाणात पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त महानगरपालिका कार्यक्षेत्रात अनधिकृत बांधकाम करणारे भूमाफिया आणि या बांधकामांना चोरीच्या नळजोडण्या देणारे पाणीमाफिया सक्रिय असून संबंधित महानगरपालिकेतील पाणी विभाग आणि अधिकारी यांचे संगनमत असल्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान होत आहे तसेच प्रशासन प्रामाणिक कर भरणाऱ्या नागरिकांचे हित जपण्याऐवजी भूमाफिया, पाणीमाफिया आणि अधिकारी यांना पाठीशी घालत असल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही,

सन २०१५ मध्ये झालेल्या अपुऱ्या पावसामुळे कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात ३० टक्के पाणी कपात लागू करण्यात आली होती. त्यामुळे महानगरपालिका क्षेत्राच्या काही भागात अंशत: पाणी टंचाईची समस्या उद्भवली होती. मात्र महानगरपालिका प्रशासनाने पाणी टंचाई कृती आराखड्याची अंमलबजावणी करुन पाणी टंचाईचे निवारण करण्यात आल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील जनावरांचे पालघर जिल्ह्यात स्थलांतर करण्याबाबत**

**(३४) २०५६१ (१२-०८-२०१६). श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई गुरेमुक्त करण्याचा निर्णय पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाने घेतला असून त्यानुसार मुंबईतील तबेल्यासह ३१ हजाराहून अधिक जनावरांचे पालघर जिल्ह्यातील दापचरी येथे स्थलांतर करण्यात येणार असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील तबेले स्थलांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर (१८-१०-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) शासनाच्या दिनांक १ जुलै, २००६ रोजीच्या अधिसुचनेनुसार व मा. उच्च न्यायालय येथे मुंबईतील तबेले स्थलांतरणाबाबत दाखल असलेल्या विविध याचिकेअंतर्गत मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार मुंबईतील तबेले स्थलांतरित करण्याची कार्यवाही करण्यात येत असून संबंधित तबेलेधारकांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जानुसार त्यांच्या जनावरांकरिता दापचरी येथे जागा उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

---

**राज्यातील डान्सबार बंद करण्याबाबत**

**(३५) २०६७५ (२४-०८-२०१६). श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक १५६६१ ला दिनांक २३ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील डान्सबार परवान्याबाबत नवीन कायदा राज्य शासनाने अस्तित्वात आणल्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयाने माहे एप्रिल-मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान राज्य शासनाच्या कार्यवाही विरुध्द नाराजी व्यक्त करुन राज्य शासनास काही सूचना/आदेश दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सूचना / आदेशाचे स्वरुप काय आहे,

(३) तसेच, राज्यातील डान्सबारवर कायमस्वरुपी बंदी आणावी अशी मागणी करीत विविध सामाजिक संघटनांनी आझाद मैदानावर शासनाच्या विरुध्द निदर्शने केल्याचे दिनांक ७ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात डान्सबारवर कायमस्वरुपी बंदी आणण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) हे अंशत: खरे आहे. डान्सबार बंदीसाठी सरकारने परीपूर्ण कायदा करावा या मागणीसाठी डान्सबार विरोधी मंच या संघटनेमार्फत आझाद मैदानावर दिनांक ६/५/२०१६ रोजी निदर्शने करण्यात आली होती.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुण्यातील लाखो व्यावसायिकांकडे स्थानिक संस्था कराची**
**कोटयवधी रुपयांची थकबाकी थकीत असल्याबाबत**

**(३६) २०६९८ (२३-०८-२०१६). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानु खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील लाखो व्यावसायिकांच्या हट्टापायी शासनाने महापालिका हद्दीतील स्थानिक संस्था कर (एलबीटी) रद्द करण्याचा निर्णय घेतला मात्र या व्यावसायिकांकडे एलबीटी करापोटी कोटयवधी रुपयांची थकबाकी थकित असून ती वसूल करण्यासाठी प्रशासनाने आतापर्यंत सुमारे साडे तीन लाख व्यावसायिकांना नोटीस पाठविल्या असल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महापालिका प्रशासनाने किती व्यावसायिकांकडून थकबाकी वसूल केली आहे व थकबाकी न देणाऱ्या व्यावसायिकांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१०-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात दाखल झालेल्या विवरणपत्रांपैकी आजअखेर ३,७९८ विवरणपत्रांची तपासणी करण्यात आलेली असून, त्यापैकी तपासणीअंती ५४१ नोंदणी धारकांनी कमी स्थानिक संस्था कर भरल्याचे निदर्शनास आले असून, त्यांना स्थानिक संस्था कर नियम ३३ प्रमाणे नमुना “त्र” ची मागणी नोटीस महानगरपालिकेकडून पाठविण्यात आलेली आहे.

(२) पुणे महानगरपालिकेकडून ३८२ नोंदणीधारकांकडून कराची व्याजासह वसुली करण्यात आली आहे व उर्वरीत, १५९ नोंदणीधारकांकडून व्याजासह स्थानिक संस्था कर वसुली करण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि. ठाणे) येथे विविध बँकेच्या पाच एटीएम मशिनमध्ये भरणा करण्यासाठी दिलेली रक्कम तीन कंत्राटी कामगारांनी पळविल्याबाबत**

**(३७) २०८१२ (२४-०८-२०१६). श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि. ठाणे) येथे विविध बँकेच्या पाच एटीएम मशिनमध्ये भरणा करण्यासाठी दिलेली ८० लाख रुपयांची रक्कम तीन कंत्राटी कामगारांनी पळविल्याची घटना दिनांक ३० एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पळविलेली रक्कम वसूल करणेबाबत व सदरील कंत्राटी कामगारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) वरील अपहार रक्कमेप्रकरणी पोलीस तपासात निष्पन्न झालेल्या एकुण ३ कंत्राटी कामगारांना अटक करण्यात आली. तथापि, सदरची रक्कम ही त्यांनी राजश्री लॉटरीमध्ये लॉटरी खेळल्यामुळे लॉटरीत हारलेबाबत सांगितली आहे. त्यामुळे अपहार केलेली रक्कम वसुल करता आली नाही.

तरी, त्यांचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोपरखैरणे (नवी मुंबई) येथील स्वराज बिल्डरचे संचालक यांनी सिडकोच्या मनमानी कारभाराला कंटाळून आत्महत्या केल्याबाबत**

**(३८) २१०३९ (२३-०८-२०१६). श्री.हेमंत टकले, श्री.रामराव वडकुते, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरखैरणे (नवी मुंबई) येथील स्वराज बिल्डरचे संचालक यांनी सिडकोच्या मनमानी कारभाराला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१६) :** (१) स्वराज्य बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स, वाशी नवी मुंबईचे संचालक यांनी त्यांचा आत्येभाऊ याचेवर विश्वासाने व्यवसायाची जबाबदारी सोपविली होती. आरोपीने मयत इसमाचा फायदा घेऊन त्यांना प्रचंड आर्थिक संकटात आणले व कर्जबाजारी केले. यामुळे मयत इसमाचा व्यवसाय उध्वस्त होऊन त्या सर्वाचा मानसिक तणाव आल्याने आत्महत्या केली आहे.

(२) सदर प्रकरणी सानपाडा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.६१/२०१६ भा.द.वि. कलम ३०६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात एका आरोपीस अटक करण्यात आली असून अटक आरोपी जामिनावर मुक्त आहे. गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील अंमली पदार्थाची वाढती तस्करी रोखण्याबाबत**

**(३९) २१३७४ (२३-०८-२०१६). ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील वाडीबंदर परिसरात अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या २० ते २५ नायजेरियन टोळीने पोलिसांवर दगडफेक केल्यामुळे आठ पोलीस अधिकारी व कर्मचारी जखमी झाल्याची घटना दिनांक २९ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मुंबईतील अंमली पदार्थाची वाढती तस्करी रोखण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१०-२०१६) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

सदर प्रकरणी अटक आरोपी व त्यांच्या साथीदारांनी गैरकायद्याची मंडळी जमा करुन पोलीसांना त्यांचे कर्तव्य पार न पाडण्यासाठी त्यांचेवर हल्ला केला व जीवे-ठार मारण्याच्या उद्देशाने जखमा केल्या त्याचप्रमाणे अटक आरोपी हे मादक पदार्थ बाळगत असल्याचे आढळून आले म्हणून त्यांचे विरुद्ध डोंगरी पोलीस ठाणे, गुन्हा रजिस्टर क्रमांक ७९/२६, कलम-३०७, ३५३, ३३२, ३३७, १४३, १४७, १४८, १४९(ए), १३५, ८(क) सह २१, २९ एन.डी.पी.एस.ॲक्ट १९८५ अन्वये दिनांक ३०/४/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमूद गुन्ह्यात एकुण ५ आरोपींना अटक करण्यात आली असून हे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

ड्रगचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध कार्यक्रम हाती घेण्यात आलेले आहेत. अंमली पदार्थ विरोधी कक्षातर्फे महाविद्यालयीन स्तरावर जानेवारी, २०१५ पासून "ड्रग्ज फ्रि कॅम्पस" हा उपक्रम राबवून जनजागृती करण्याचे प्रयत्न चालू केले आहेत. तसेच सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्री, दहिहंडी अशा उत्सवाच्या वेळी अंमली पदार्थ कक्षाच्यावतीने जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. तसेच वेगवेगळ्या एन.जी.ओ. संस्थाच्यावतीने व्यसनाधीन इसमांवर/मुलांवर उपचार करण्यात येतात. तसेच २६ जून हा अंमली पदार्थ विरोधी दिन म्हणून पंधरवडा साजरा करण्यात येतो. या वर्षी सदर पंधरवड्यादरम्यान पुढील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले. अंमली पदार्थ व त्याचे दुष्पपरिणाम याबाबत विद्यार्थींना माहिती देणे, फिल्म

दाखविणे, माहिती, चर्चासत्र, हॅन्डबील वाटप व भिंती पोस्टर्सचे प्रदर्शन करणे. तसेच प्रचार फेऱ्या, मॅरेथॉन, मोहल्ला कमिटी, पब्लिक मिटींग तसेच २६ जून, २०१६ रोजी बीकेसी या ठिकाणी एन.सी.बी. च्या सहकार्याने अंमली पदार्थांचे दुष्परिणामाबाबत जनजागृती होणेकरिता एक मिनी मॅरेथॉनचे आयोजन केले होते. तसेच यापुढे ही अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित केलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद महापालिकेतील कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधास मान्यता देणेबाबत**

**(४०) २१७८१ (२३-०८-२०१६). श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महापालिकेची स्थापना सन १९८४ साली झाली असून वर्ग १ ते ४ ची ४१४४ पदे मंजूर आहेत व महापालिका अस्तित्वात आल्यानंतर सन १९९१ साली कर्मचारी भरती झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास मंजूर असलेल्या ४१४४ पदांपैकी ४८० पदे रिक्त असून पुढील दोन वर्षात ३०% कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आकृतीबंधानुसार शासनाकडे मान्यतेसाठी प्रलंबित असलेल्या नवीन १५०० पदास मान्यता देण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, राज्यात इतर “क” वर्ग महापालिकेत ७५०० ते ८००० कर्मचारी कार्यरत आहेत त्याप्रमाणे औरंगाबाद महापालिकेतील पदांना मान्यता देण्यात येणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अधिकारी/कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध तयार करण्यात आलेला असून त्यामध्ये अतिरिक्त १७६५ पदांचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर आकृतीबंधास औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता प्रलंबित आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील गोरेगांव स्थानक पूर्व ते नागरी निवारा परिषद वसाहत आणि मालाड रेल्वे स्थानक पूर्व ते अप्पापाडा या मार्गावर पॉईंट टू पॉईंट बससेवा सुरु करण्याबाबत**

**(४१) २१९०२ (२३-०८-२०१६). श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगांव रेल्वे स्थानक पूर्व ते नागरी निवारा परिषद वसाहत आणि मालाड रेल्वे स्थानक पूर्व ते अप्पापाडा या मार्गावर पॉईंट टू पॉईंट बेस्ट बस सेवा सुरु करण्याची मागणी करणारे निवेदन बेस्टचे महाव्यवस्थापक यांना दिनांक १७ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास मुंबईच्या लोकप्रतिनिधींनी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याअनुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) गोरेगांव (पूर्व) ते नागरी निवारा परिषद वसाहत या दरम्यान पॉईंट टू पॉईंट बससेवा सुरु करण्याबाबतच्या मागणीनुसार परीक्षण करण्यात येऊन, दिनांक १ ऑगस्ट, २०१६ पासून बसमार्ग क्रमांक ३४३ वर गोरेगांव (पूर्व) दिंडोशी बसस्थानक दरम्यान जलदसेवा सुरु करण्यात आली होती.

तथापि, सदर पॉईंट टू पॉईंट सेवा सुरू केल्यानंतर सदर बस मार्गावरील प्रवासी प्रतिसाद कमी झाल्याचे आढळल्याने प्रवाशांच्या सोयीकरिता सदर बसमार्गाचे प्रवर्तन दिनांक १ सप्टेंबर, २०१६ पासून पूर्ववत करण्यात आले आहे.

मालाड रेल्वे स्थानक (पूर्व) ते आप्पापाडा (आनंदनगर) या दरम्यान सध्या कार्यरत असलेल्या बसमार्ग क्रमांक ६२४ वर पॉईंट टू पॉईंट सेवा देण्याकरिता बेस्ट उपक्रमातर्फे प्रवाशांच्या चढ-उताराचे सर्वेक्षण करण्यात आले असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**धनकवडी (पुणे) येथील श्री. गौड ब्राम्हण समाजातील जात पंचांवर कारवाई करणेबाबत**

**(४२) २१९८६ (२४-०८-२०१६). श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जात पंचायत कायद्यानुसार कुटुंबाला वाळीत टाकणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची तरतूद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धनकवडी (पुणे) येथील श्री. गौड ब्राम्हण समाजातील जात पंचायतीच्या पंचांनी एका कुटुंबाला वाळीत टाकल्याचा प्रकार माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार उक्त प्रकरणातील आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) फिर्यादी श्री गौड ब्राम्हण समाजाचे असून, त्यांच्या मुलांने इंदौर येथील ब्राम्हण समाजाच्या मुली सोबत सन २०११ मध्ये इंदौर येथे विवाह केला होता. या कारणावरुन श्री.गौड ब्राम्हण समाजातील जात पंचायतीच्या पंचांनी फिर्यादी व त्यांचे कुटूंबियांना समाजातून बहिष्कृत केले व पुन्हा समाजामध्ये परत घेण्यासाठी १ लाख रु. भरण्यास सांगितले, असे दिलेल्या तक्रारीवरुन सहकारनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ८३/२०१६, भादंविक १२० (ब), ३४१, ३८४, ५०६ (२) प्रमाणे दिनांक १७/०४/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात आरोपी क्र. १ ते ६ यांना अटक करण्यात आली असून, गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे ओणी (ता.राजापूर, जि. रत्नागिरी) येथील हरविलेली महिला आणि तिच्या तीन मुलांचा तपास करणेबाबत

**(४३) २२०३४ (२३-०८-२०१६). श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ओणी (ता. राजापुर, जि. रत्नागिरी) येथील हरवलेल्या रुकसाना आणि तिच्या तीन मुलांच्या तपासाबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक २९ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनातील मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरुन एक महिला आणि तिची तीन मुले नापत्ता झाल्याबाबत राजापूर पोलीस ठाणे येथे नापत्ता रजि.नं. ०६/२०१६ दाखल करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी तपासामध्ये नापत्ता महिलेच्या मोबाईलच्या कॉल रेकॉर्डवरुन व टॉवर लोकेशनवरुन ती पुणे धनोरी येथे असल्याचे समजल्यामुळे पुणे धनोरी व आजुबाजूचे परिसरात शोध घेतला असता नापत्ता महिला तिच्या तीन मुलासह प्रियकरा सोबत साठे वस्ती धनोरी पुणे येथे झोपडपट्टीत राहत असताना मिळून आली. तद्नंतर नापत्ता महिला व तिची तीन मुले यांना राजापूर पोलीस ठाणे येथे आणून फिर्यादीचे ताब्यात देवून त्यांचे जाबजबाब लिहून घेण्यात आले. नापत्ताची खबर देणार यांची कोणतीही तक्रार नसल्याने सदरचे नापत्ता प्रकरण दप्तरी फाईल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वक्फ बोर्डातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४४) २२१४२ (१२-०८-२०१६). श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वक्फ बोर्डात मंजूर असलेल्या पदांपैकी ६० टक्के पदे रिक्त असल्यामुळे वक्फ बोर्डात कार्यरत असलेल्या अपुऱ्या मनुष्य बळामुळे कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडत असून नागरिकांची कामे वेळेवर होत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वक्फ बोर्डात १० वर्षापासून फक्त ४६ कर्मचारी कार्यरत असून रिक्त पदे भरण्यासाठी वक्फ बोर्ड शासनाकडे सन २०१४ पासून पाठपुरावा करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वक्फ बोर्डाची मंजूर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-१०-२०१६) :** (१) व (२) अशंतः खरे आहे. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या अधिपत्याखालील जमिनींवर करण्यात आलेली अतिक्रमणे दूर करण्यासाठी तसेच या मंडळाच्या महसुली उत्पन्नात भरीव वाढ होऊन मंडळाला स्वावलंबी बनविण्याच्या दृष्टीने मंडळाच्या आस्थापनेची पुनर्रचना करुन पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती व कोकण येथे ५ प्रादेशिक विभागीय कार्यालय सुरु करण्याच्या व कर्मचाऱ्यांची संख्या ५१ वरुन १०६ इतकी करण्याच्या वक्फ मंडळाच्या प्रस्तावास दिनांक १०/०८/२०१० च्या शासन पत्रान्वये सहमती प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच सदर पदांवर भरती करण्यासाठी आवश्यक असलेल्या सेवाप्रवेश नियमावलीच्या मसुद्यास दिनांक १५/१०/२०१३ च्या शासन पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली असून यासंदर्भातील अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करणे बाबत वक्फ मंडळास कळविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुलाबा (मुंबई) येथे मृत व्यक्तीच्या नावाने जलजोडणी देणा-यावर कारवाई करणेबाबत**

**(४५) २२१५२ (२४-०८-२०१६). ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलाबा (मुंबई) येथील कॅप्टन प्रकाश पेठे मार्गावरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगरमध्ये महापालिकेच्या "अ" विभागातून मृत व्यक्तीच्या नावाने जलजोडणी दिल्याची बाब दिनांक ३० मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०१६) :** (१) कुलाबा (मुंबई) येथील कॅप्टन प्रकाश पेठे मार्गावरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगरमध्ये महापालिकेच्या “अ” विभागातून मृत व्यक्तीच्या नावाने जलजोडणी दिल्याची तक्रार दिनांक ३० मे, २०१६ रोजी प्राप्त झाली, हे खरे आहे.

(२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगरमधील न्यू मिलिंद मित्र मंडळाला सन २००३ मध्ये दिलेल्या प्रपत्रामधील ३४ पात्र सभासदांपैकी एक श्रीमती सुंदराबाई बल्लाळ या पात्र सभासद होत्या. त्यामुळे त्यांची झोपडी ही पाणी पुरवठ्यास पात्र होती.

सदर मंडळाचे सन २०१० मध्ये दोन गटांमध्ये विभाजन होऊन सदर ३४ सभासदापैकी १६ सभासदांसाठी निर्माण झालेल्या न्यू मिलिंद मित्र मंडळामध्ये श्रीमती बल्लाळ यांची झोपडी अंतर्भूत होती.

नवीन मंडळाच्या सचिव यांनी सादर केलेल्या खुलाशानुसार, श्रीमती बल्लाळ या दिनांक १८/१/२००५ रोजी मृत झाल्या होत्या. परंतु सन २००३ मध्ये केलेल्या पडताळणीनुसार श्रीमती बल्लाळ पात्र सभासद असल्यामुळे त्यांच्या मृत्यूपश्चात सुध्दा त्यांची झोपडी पाणी पुरवठ्यास पात्र ठरत होती.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोंबिवली (जि.ठाणे) येथील पांडूरंगवाडी परिसरातील महाविद्यालयीन विद्यार्थीनीच्या खूनाच्या तपासाबाबत**

**(४६) २२२३० (२४-०८-२०१६). प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक १३९९७ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील पांडुरंगवाडी परिसरात निनाद सोसायटीत राहणाऱ्या कुमारी स्नेहल हिंदुराव गवारे या महाविद्यालयीन विद्यार्थीनीचा खून झाल्याने डोंबिवली पोलीस स्थानकात गु.र.क्र.१६७/२००७, भा.द.वि.स. कलम ३०२ व २०१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू घटनेस ९ वर्षांचा कालावधी होवूनही गुन्हा अद्यापही तपासाधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू गुन्ह्याचा तपास पूर्ण होण्यास अजून किती कालावधी लागणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

ठाणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ ३ कल्याण विभागातील डोंबिवली येथे दिनांक १९ जुलै, २००७ रोजी १२.३० वा. ते सायंकाळी ६.०० वा. चे दरम्यान कु.स्नेहल हिंदुराव गवारे वय २१ वर्ष रा.निनाद को.ऑप.हौ.सोसायटी, ब्लॉक नं.१२ पांडुरंगवाडी, पांडूरंग विद्यालय समोर, डोंबिवली (पूर्व) ही घरी एकटी असतांना कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणांवरुन तीचे दोन्ही हात पाठीमागे परकरने व तोंडास सफेद पंचा बांधून खून केला. तिचे प्रेत घरातील बेडरुम मधील बेड बॉक्समध्ये ठेवून पुरावा नष्ट केला याबाबत कु.स्नेहल गवारे हिचे वडील श्री.हिंदुराव गवारे यांनी दिनांक २० जुलै, २००७ रोजी दिलेल्या फिर्यादी वरुन डोंबिवली पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं. १६७/२००७, भा.दं.वि. कलम ३०२, २०१ प्रमाणे अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील संशयीत आरोपी हिरेन भरत राठोड त्याचेविरुध्द दोषारोप पत्र सादर करणे इतका सबळ पुरावा होत नसल्याने त्यास त्या गुन्ह्यातून सी.आर.पी.सी.१६९ प्रमाणे मुक्त करीता मा.न्यायालयास विनंती रिपोर्ट सादर केला होता. त्यावर दिनांक ३१ जानेवारी, २०११ रोजी मा.न्यायालयाने सदर गुन्ह्याचा सी.आर.पी.सी. १५६(३) प्रमाणे तपास करण्याचा आदेश केला आहे. आदेशाप्रमाणे दिनांक ३० जून, २०११ रोजी पासून सदर गुन्ह्याचा तपास गुन्हे अन्वेषण विभाग कल्याण युनिट हे करीत आहेत.
(३) व (४) सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

---

**डहाणू (जि.पालघर) जवळ वाढवण बंदर उभारण्याचे काम सुरु करण्याबाबत**

**(४७) २२३४९ (२३-०८-२०१६). श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) जवळ वाढवण बंदर उभारण्याच्या सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्या असून त्यासाठी निविदा काढण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निविदा प्रक्रिया पूर्ण करुन सदर बंदर उभारणीचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि डहाणू जवळील बंदर प्रकल्पाबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याचे काम जवाहरलाल नेहरु बंदर विश्वस्त यांच्यामार्फत सुरु असून ते अंदाजे मार्च, २०१७ पर्यंत पूर्ण होईल. सविस्तर प्रकल्प अहवालाअंती प्रकल्पाबाबत येणारा खर्च निश्चित झाल्यावर व सर्व वैधानिक बाबींची पूर्तता झाल्यानंतर निविदा प्रक्रिया सुरु होणे अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखली नगरपरिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या घरकुल योजनेतील वाढीव अनुदानाच्या वाटपाबाबत**

**(४८) २२४०४ (२३-०८-२०१६). श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली नगरपरिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या घरकुल योजनेतील वाढीव अनुदानाच्या टप्प्याचे त्वरीत वाटप करा तसेच भौतिक सुविधांची कामे सुरु करा अशी मागणी होत असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०९-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) सदर घरकुल योजना लाभार्थ्यांमार्फत राबविण्यात येत असल्याने लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची छाननी तसेच त्यांच्या खात्याच्या पासबुकची आणि व्हाऊचरची तपासणी करण्याकामी कालावधी लागला आहे,

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार अकोला यांच्यामार्फत लाभार्थ्यांचा वाढीव अनुदानाचा प्रस्ताव तपासुन जून महिन्यापासून वाढीव अनुदान वाटपास नगरपरिषदेने सुरुवात केलेली आहे.

---

**अहमदनगर येथील व्यक्ती इस्लामिक स्टेटस ऑफ सिरिया (इसिस) या दहशतवादी संघटनेच्या संपर्कात असल्याबाबत**

**(४९) २२५३२ (२३-०८-२०१६). श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथील २० व्यक्ती इस्लामिक स्टेटस ऑफ सिरिया (इसिस) या दहशतवादी संघटनेच्या संपर्कात असल्याची बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्राथमिक शाळांना ५ वी व ८ वी चे वर्ग जोडण्याचे बेकायदेशीर आदेश मागे घेणेबाबत**

**(५०) २२७२५ (२३-०८-२०१६). श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्थानिक स्वराज्य संस्थेच्या १ ते ४ वर्गाच्या शाळांना ५ वी चा व १ ते ७ वर्गाच्या शाळांना ८ वी चा वर्ग सरसकट जोडण्याचे आदेश शासनाने दिलेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही कार्यवाही बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील कोणत्या कलमांतर्गत अथवा नियम २०११ मधील कोणत्या नियमांतर्गत केली,

(३) असल्यास, शासनाच्या या कार्यवाहीमुळे एकाच गावातील प्राथमिक व माध्यमिक शाळांतून ५ वी व ८ वी चे अल्प पट संख्येचे समांतर वर्ग चालून अनिष्ट स्पर्धा सुरु होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनिष्ट स्पर्धेला व शिक्षकांची पदे अतिरिक्त ठरविण्याबाबत शासनादेश रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (१८-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) प्रस्तुत कार्यवाही बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील कलम ६ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ मधील नियम ४(१), ४(२), ४(४) अन्वये करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.